# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

जागतिक व्यापार केंद्र, केंद्र क्र. १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई- ४०० ००५

दूरध्वनीः ०२२ - ६९८७ ६६६६

ई-मेल: mercindia@merc.gov.in संकेत स्थळ: www.merc.gov.in


MERC

Advertisement No. 07/2025

## विद्युत अधिनियम, २००३ (विअ, २००३) च्या कलम (१५) च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) अंतर्गत नोटीस [सन २०२३ चे प्रकरण क्र. २]

१. टोरेण्ट पॉवर लिमिटेड (टीपीएल) ने, पुणे महानगरपालिका (पीएमसी), पिंपरी चिंचवड महानगरपालिका (पीसीएमसी), आणि पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड, सासवड, रांजणगाव, चाकण, तळेगाव, कुरकुंभसह अन्य क्षेत्रांमध्ये, विजेचे वितरण करण्यासाठी वितरण परवाना मंजूर करण्याकरिता अर्ज केला आहे.

२. टीपीएलने, विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (२) नुसार त्यांच्या अर्जाची नोटीस 'हिंदुस्तान टाईम्स', 'टाईम्स ऑफ इंडिया', 'लोकमत' आणि 'महाराष्ट्र टाईम्स' या वर्तमानपत्रांमध्ये दि. ८ जानेवारी, २०२३ रोजी प्रसिध्द केली होती.

३. स्थूलमानाने, या परवाना क्षेत्रात पीएमसी, पीसीएमसी आणि पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड, सासवड, रांजणगाव, चाकण, तळेगाव, कुरकुंभसह अन्य क्षेत्राचा समावेश आहे. परवान्याच्या प्रस्तावित क्षेत्राची तपशीलवार माहिती हवी असणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी टीपीएलने परवान्याच्या मंजुरीसाठी सादर केलेला अर्ज कृपया पाहावा. सदर अर्ज, आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

४. टीपीएलचे नोदणीकृत कार्यालय समन्वय, ६००, तपोवन, अंबावाडी, अहमदाबाद ३८००१५ येथे आहे.

५. टीपीएलने आयोगाला सादर केलेल्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या जोडपत्रांसह आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत स्थळावर किंवा कोणत्याही व्यक्तिला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) विनियम, २०२२ मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे पालन करुन आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

६. वर्तमानपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या वरील अर्जाच्या नोटीशीच्या संदर्भात, जनतेकडून सूचना आणि हरकती प्राप्त झाल्या होत्या. पटलावर उपलब्ध असलेल्या माहितीचा विचार केल्यानंतर, आयोगाचे सकृतदर्शनी समाधान झाले आहे की, अर्जदार प्रस्तावित क्षेत्रामध्ये विजेचा पुरवठा करण्याकरिता वित्तरण परवाना मंजूर करण्यासाठी अर्हताप्राप्त आहे. आयोग, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ नुसार, अर्जदाराने अधिनियम व विनियमांतील आवश्यकतांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, अर्जदारास वितरण परवानाधारक म्हणून परवाना देण्याचे प्रस्तावित करीत आहे.

७. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम (१५) च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) अंतर्गत याद्वारे, आयोगाने अर्जदाराला वितरण परवाना मंजूर करण्याच्या प्रस्तावाच्या संदर्भात सूचना किंवा हरकती, असल्यास, त्या मागविण्यासाठी नोटीस देण्यात येत आहे. प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर सूचनेच्या संबंधात, प्रत्येक इच्छुक व्यक्तीला आयोगाच्या संकेत स्थळावरील E public consultation या टॅबद्वारे अपलोड करुन त्यांच्या सूचना/हरकती इंग्रजी किंवा मराठी भाषेमध्ये लेखी सादर करता येईल (www.merc.gov.in/e-public-consultation). या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास, संबंधित व्यक्ती कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या दरम्यान मोबाईल क्र. ८९२८०७१५२२ वर किंवा suggestions@merc.gov.in या ई-मेल आयडीवर आयोगाच्या कार्यालयाशी संपर्क साधू शकतात.

८. ज्या व्यक्तीने आयोगाच्या 'E-Public Consultation' या टॅबवर सूचना आणि हरकती दाखल केल्या असतील त्यास त्याच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीला इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करणे शक्य नाही त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई- ४०० ००५ या पत्त्यावर, या सूचना आणि हरकतींची प्रत श्री राघवेंद्र राव, महाव्यवस्थापनक, टोरेण्ट पॉवर लि., आदेश्वर टॉवर ए विंग, कामतघर, नारपोली, जुना मुंबई आग्रा रोड, भिवंडी, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र ४२१ ३२०, email: applications@torrentpower.com यांना देण्यात आल्याच्या पुराव्यासह, पाठवावी आणि त्यावर पाठविणाऱ्याने आपले पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता, असल्यास, कळवावा. १६ जुलै, २०२५ रोजी सायंकाळी ५.०० नंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना/ हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

९. टीपीएल, १६ जुलै, २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व हरकती/अभिप्रायांमधील प्रत्येक हरकती/अभिप्रायास त्या प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत, परंतु १९ जुलै, २०२५ नंतर नाही, उत्तर पाठविल. टीपीएलने दिलेल्या उत्तरांवर हितसंबंधितांना त्यांची प्रत्युत्तरे ई-जन सुनावणी दरम्यान किंवा २३ जुलै, २०२५ पर्यंत सादर करता येतील.

१०. वर दिल्यानुसार अभिप्राय/हरकती पाठविणाऱ्या प्रेषक/आक्षेपकाला त्याचे/तिचे म्हणणे जाहीर ई-सुनावणीमध्ये व्यक्तिशः आयोगासमोर मांडावयाचे असल्यास त्याने/तिने सूचना/हरकती दाखल करताना तसे विशेषत्वाने नमूद करावे. अशा प्रकरणी, वैध ई मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य राहील. आयोग, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, अशा प्रेषक/आक्षेपकाला ई-सुनावणीमध्ये त्याचे म्हणणे मांडण्याची परवानगी देईल.

११. जाहीर ई-सुनावणीत भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती आयोगाने दि. १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी जारी केलेल्या याचिकेच्या ई-फायलिंग आणि ई-सुनावणीसाठी अनुसरावयाची परिचालनात्मक कार्यपध्दती आणि प्रोटोकॉलमधील कार्यप्रणाली निर्देशांचे पालन करतील.

१२. मंगळवार, दि. २२ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात यावयाच्या ई-सुनावणीमध्ये टीपीएलचा परवाना अर्ज विचारात घेण्यात येईल. या प्रयोजनासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**दिनांक : २३ जून, २०२५** — **(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**

**ठिकाण : मुंबई** — **सचिव, मविनिआ**